नाशिक महापालिकेचा 'क्लीन गोदावरी बॉण्ड' राष्ट्रीय शेअर बाजारात सूचीबद्ध >>पान 2

६ डिसेंबरला मुंबईला येण्यासाठी धावणार १२ विशेष लोकल, मध्य रेल्वेचे संपूर्ण वेळापत्रक >>पान 3

मेहकरमध्ये लोकशाहीचा मोठा जल्लोष >>पान 4

**सुविचार**

दीर्घकाळ धुमसत राहण्यापेक्षा क्षणभरच का होईना प्रज्वलित होणे चांगले.– महाभारत

दैनिक


# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 117 ■ बुधवार, दि. 03 डिसेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




दिल्लीनंतर १२० बहादूर राजस्थानमध्येही करमुक्त, फरहान अख्तरनं मुख्यमंत्र्यांचे मानले आभार...

आतील पान

## आता प्रत्येक स्मार्टफोनमध्ये संचार सारथी ॲप सरकारकडून बंधनकारक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सरकारने भारतात आगामी उत्पादन घेणाऱ्या मोबाईल उत्पादक कंपन्यांना स्मार्टफोनमध्ये संचार सारथी ॲप इन्स्टॉलेशन करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे या उत्पादकांना हे ॲप इन्स्टॉलेशन करणे अनिवार्य असेल यामध्ये ग्राहकांच्या सुरक्षेसाठी, ग्राहकांच्या खाजगी माहितीचे संरक्षण करण्याची, व विना अडथळा ग्राहकांना वापर सुनिश्चित करण्यासाठी आणखी सर्वात मुख्य म्हणजे खाजगी डेटाचा गैरवापर टाळण्यासाठी हे पाऊल सरकारच्या डिपार्टमेंट ऑफ टेलिकॉम विभागाने केले आहे. त्यामुळे सरकारने नुकत्याच जारी केलेल्या 'संचार साथी इनिशिएटिव' मोहीमेचे अंमलबजावणी करण्यासाठी सरकारने काही उत्पादक व बाहेरून पार्टस अथवा स्मार्टफोन मागवणाऱ्या आयातदारांना या नियमांचे पालन बंधनकारक केले गेले आहे.

सोमवारी दूरसंचार मंत्रालयाकडून जारी केले गेलेल्या निवेदनानुसार ग्राहकांना हे ॲप अनइन्स्टॉल किंवा डिसेबर करता येणार नाही असे म्हटले आहे. ज्यांना स्मार्टफोनची विक्री केली आहे अथवा नुकतेच उत्पादन केलेले आहे त्यांना सॉफ्टवेअर अपेडटमधून ॲप प्रसारित करणे बंधनकारक असणार आहे. नव्या नियमानुसार, या नियमांची अंमलबजावणी लागू झालेल्या तारखेपासून ९० दिवसात अथवा रिपोट पाठवल्यानंतर १२० दिवसात करणे उत्पादकांना बंधनकारक असेल. सायबर घोटाळे रोखण्यासाठी सरकारने हे धोरणात्मक पाऊल उचलले आहे.

या ॲपचा ग्राहकांना फायदा कसा?

सरकारने संचार सारथी पोर्टल व ॲप विकसित केले आहे. याला भेट व इन्स्टॉल करून ग्राहकांना यांच्या आयएमईआय नंबरची अस्सलता तपासता येणार आहे. याशिवाय संशयी फोन, मेसेज, संशयी सायबर क्रियांचे रिपोर्टिंग या माध्यमातून करता येणार आहे.चोरी गेलेल्या मोबाईलचा आयएमईआय तपासता येऊन स्मार्टफोन कोणाच्या नावावर आहे याची खात्रीलायक तपासणी करता येणार आहे. तसेच बँक फायनांशियल इन्स्टिट्युशनची खात्रीलायकता यातून स्पष्ट होणार आहे. ब्लॉक केलेलेकाळ्या यादीतील IMEIs संचार साथी ॲप वापरून तपासता येतात. अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही उपकरणांवर विविध सेवा मिळविण्यासाठी संचार साथी मोबाईल ॲप डाउनलोड करता येते.

या नियमात आणखी काय?

टेलिकॉम सायबर सिक्युरिटी नियमांनुसार केंद्र सरकारला आता आंतरराष्ट्रीय मोबाइल उपकरण ओळख




क्रमांक असलेल्या दूरसंचार उपकरणांच्या उत्पादकांना (Original Equipment Manufacturers OEMs) दूरसंचार उपकरणे किंवा घ्श्एघ् क्रमांकाबाबत आवश्यकतेनुसार मदत करण्यासाठी निर्देश जारी करण्याचा अधिकार आहे.

नियमांमध्ये असेही म्हटले आहे की अशा उत्पादकांनी किंवा आयातदारांनी नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र सरकारने जारी केलेल्या निर्देशांचे पालन करावे लागेल.

याविषयी मंत्रालयाने दिलेल्या स्पष्टीकरणात म्हटले आहे की,'डुप्लिकेट किंवा स्पूफ केलेले खचएख असलेले मोबाइल हँडसेट टेलिकॉम सायबर सुरक्षेला गंभीर धोका निर्माण करतात. ई-कॉम नेटवर्कमध्ये स्पूफ केलेलेटॅप केलेले घ्श्एघ् एकाच वेळी वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या डिव्हाइसेसमध्ये काम करत असताना आणि अशा घ्श्एघ् विरुद्ध कारवाई करण्यात आव्हाने निर्माण करतात. भारतात मोठ्या प्रमाणात सेकंड-हँड मोबाइल डिव्हाइस मार्केट आहे.' याशिवाय चोरीला गेलेली किंवा काळ्या यादीत टाकलेली उपकरणे पुन्हा विकली जात असल्याचेही आढळून आले आहे, असे मंत्रालयाने म्हटले आहे. यामुळे खरेदीदार गुन्ह्यांमध्ये सहभागी होतो आणि त्यांचे आर्थिक नुकसान होते.

## महाडमध्ये राडा, महायुतीचे कार्यकर्ते भिडले, काही काळ तणावाचे वातावरण

दैनिक आपला विदर्भ

**अलिबाग/प्रतिनिधी :** महाड नगरपालिका निवडणूकीला गालबोट लागले आहे. मतदान प्रक्रीयेदरम्यान शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले आहेत. राजकीय वादावादीचे पर्यवसन हाणामारी झाले असून काही वाहनांची तोडफोडही करण्यात आली आहे. दोन्ही गट आक्रमक झाल्याने महाड मध्ये काही काळ तणाव निर्माण झाला होता.

महायुतीमध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र असले तरी दोन्ही पक्षात दोन्ही पक्षात सातत्याने वाद होत होते. नगरपालिका निवडणूकीच्या निमित्ताने हे वाद विकोपाला गेल्याचे दिसून येत होते. प्रचारादरम्यान दोन्ही पक्षातील नेत्यांकडून एकमेकांविरोधात आरोप प्रत्यारोप केले गेले. त्यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. त्याचे रुपांतर महाड नगरपालिका निवडणूकीत हाणामारी पर्यत पोहोचल्याचे मंगळवारी दिसून आले.

महाड नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक दोन मधील मतदान केंद्रातील मतदान यंत्रात सकाळच्या सत्रात सातत्याने बिघाड होत होता. सतत होणाऱ्या या बिघाडामुळे मतदान प्रक्रीयेत व्यत्यय येत होता. त्यामुळे मतदान केंद्रावर गर्दी झाली होती. या गर्दीचे पर्यवसन वादात झाले. शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे कार्यकर्ते एकमेकांविरोधात आक्रमक झाले. एकमेकांना शिवीगाळी करण्यात आली.

## मतदान करण्याचे राहून गेले, मतदान केंद्रावर महिलेचा मृत्यू, धाराशिवमधील घटना

दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/प्रतिनिधी :** राज्यभरात नगरपंचायत आणि नगर परिषद निवडणुकीसाठी मतदान सुरू आहे. पैसे वाटप, बोगस मतदारांच्या घटनांनी उच्छाद मांडला आहे. अशातच तुळजापुरात मतदानासाठी आलेल्या महिलेचा मतदान केंद्रावर चक्कर येऊन पडल्याने मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर मतदारसंघामध्ये ही घटना घडली. राजश्री भोसले (वय ६३) असं या वृद्ध महिलेचं नाव आहे. राजश्री भोसले या तुळजापूर येथील रहिवासी होत्या.

दुपारी १२ वाजेच्या सुमारास राजश्री भोसले या मतदान केंद्रावर मतदानासाठी आल्या होत्या. पण अचानक त्या चक्कर येऊन पडल्या. त्यामुळे एकच गोंधळ उडाला. मतदान केंद्रावर उपस्थितीत गावकरी आणि निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांनी धाव घेतली.

राजश्री भोसले यांना तातडीने उपचारासाठी तुळजापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केलं होतं. पण, उपचारादरम्यान राजश्री भोसले यांचा मृत्यू झाल्याची माहिती तुळजापूर तहसीलदारांनी दिली. राजश्री भोसले यांचाा हृदयविकाराच्या धक्क्यामुळे मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. ऐन मतदानाच्या दिवशी भोसले यांच्या मृत्यूमुळे गावावर शोककळा पसरली आहे.

## सर्व नगरपरिषदा व नगरपंचायत निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरला

### मतदानोत्तर चाचण्यांच्या निष्कर्षांना २० डिसेंबरपर्यंत बंदी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई : राज्यातील सर्व २८८ नगरपरिषदा व नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. त्याचबरोबर मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्षही २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान समाप्तीच्या अर्ध्या तासापर्यंत जाहीर करता येणार नाहीत, असेही न्यायालयाच्या आदेशात नमूद केले आहे. न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगानेही संबंधित सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत.**



मतदान यंत्रांची हातळणी काळजीपूर्वक करण्यात यावी. मतदान यंत्र ठेवण्यात आलेल्या गोदामांसाठी २४ तास चोख सुरक्षा व्यवस्था तैनात करावी. सुरक्षा उपकरणे (उदा. गोदामाच्या प्रवेद्वाराबाहेरील सीसीटीव्ही, सुरक्षा आलार्म सिस्टीम, अग्निशमन यंत्रणा इ.) व्यवस्थित कार्यान्वित असल्याची खात्री करून घ्यावी. राजकीय पक्षांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींना गोदामांबाबत आणि तिथल्या सुरक्षा व्यवस्थेबाबत अवगत करावे. त्याचबरोबर निवडणूक लढविणारे उमेदवार अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींना गोदामाचे द्वार दिसेल अशा ठिकाणी बसण्यासाठी जागा निश्चित करून द्यावी, असेही निर्देश राज्य निवडणूक आयोगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे.

राज्यातील २६४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज मतदान झाले; तसेच सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार २४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदांसह सर्व सदस्यपदांसाठी आणि ७६ नगरपरिषदा व नगरपंचायतींमधील १५४ सदस्यपदांच्या जागांसाठी २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. या सर्व ठिकाणी आता २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजेपासून मतमोजणी सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## नगर परिषद निवडणूक निकाल पुढे ढकलण्यावर राज ठाकरे यांचा संताप

**मुंबई/प्रतिनिधी :** नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्याप्रमाणे २ डिसेंबर रोजी मतदान होऊन ३ डिसेंबरला निकाल लागणार होता. मात्र न्यायालयीन खटल्यांच्या पेचामुळे २४ नगरपरिषदांची निवडणूक लांबणीवर पडली आहे. मतदानाच्या आदल्या दिवशी निवडणूक पुढे ढकलण्याची करामत निवडणूक आयोगाने केल्याची राज्याच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ आहे. निवडणूक आयोगाच्या ढिसाळ कारभारावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विरोधी पक्षांनीही नाराजी व्यक्त करीत कडाडून टीका केली.



एकतर नगर पालिका निवडणुका पाच पाच वर्षे रखडलेल्या होत्या. त्यामुळे राजकीय पक्ष, स्थानिक नेते आणि उमदवार निवडणुकीची आतुरतेने वाट पाहत होते. निवडणूक आयोगाच्या घोळामुळे निवडणूक कधी होणार हे स्पष्ट होत नव्हते. अखेर २ डिसेंबर रोजी मतदान होऊन ३ डिसेंबरला निकाल लागेल, याची घोषणा निवडणूक आयोगाने केल्यावर सगळ्यांनीच सुटकेचा निश्वास टाकला. परंतु न्यायालयीन खटल्यांच्या पेचामुळे निवडणूक आयोगावर निवडणूक पुढे ढकलण्याची नामुष्की ओढावली. अगदी निवडणुकीला काही तास शिल्लक असताना आयोगाने निवडणूक पुढे ढकलत असल्याचे जाहीर केले. यावरून राज्यात विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर आणि आयोगावर आरोपांची राळ उडवली आहे.

मतदान काही तासांवर आलेले असताना राज्यातील २४ नगरपरिषदांची निवडणूक लांबणीवर टाकल्याचे निवडणूक आयोगाने सांगितले. सगळ्या देशात मनमानी सुरू आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिली आहे. याआधाही निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर राज ठाकरे यांनी अनेक आक्षेप नोंदवले होते. निवडणूक घेण्याशिवाय आणि मतदार नोंदणीशिवाय निवडणूक आयोगाला काम काय असते? जर हे काम निवडणूक आयोग करीत नसेल तर काय करतंय? असे सवाल विचारून राज ठाकरे यांनी आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले होते. शिवाय महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दुबार मतदारांच्या मुद्द्यावरून राज ठाकरे यांनी निवडणूक अधिकाऱ्यांची दोन ते तीन वेळा भेटून आक्षेप नोंदवले होते.

## निवडणुकांच्या धामधुमीत उद्धव ठाकरेंचा जबरा डाव, शिंदेंचा बडा मोहरा थेट मातोश्रीवर

**मुंबई/प्रतिनिधी :** एकीकडे राज्यात नगरपरिषदांचे मतदान सुरू आहे तर दुसरीकडे महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुंबईत घडामोडींना वेग आला आहे. स अनेकांचे सत्ताधारी पक्षात प्रवेश होताना दिसत आहे. दरम्यान, अशातच ठाणे महानगर पालिका निवडणूकीपूर्वी शिंदे गटाला मोठा धक्का बसला आहे. ठाण्यातील आणखी एका नेत्यानं ठाकरे गटात प्रवेश केला आहे, दरम्यान या पक्षप्रवेशामुळे मुंबईत वातावरण चांगलंच तापलं आहे. हा ठाकरे गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

एकनाथ शिंदे यांच्या कोपरी पाचपाखाडी मतदारसंघातील शिंदेंचे शिवसेनेचे पदाधिकारी, उपविभाग प्रमुख आबा मोरे यांनी उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत ठाकरे गटात प्रवेश केला आहे. मातोश्रीवर आज हा पक्ष प्रवेश झाला आहे. यासोबतच राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पदाधिकाऱ्यांनी देखील ठाकरे गटात प्रवेश केला आहे. यावेळी मोठा शक्ती प्रदर्शन करत शिवसेना ठाकरे गटात पक्ष प्रवेश केला आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले, गेल्या काही महिन्यांपासून पक्षप्रवेश सुरू असून कट्टर शिवसैनिक हे परत येत आहेत. हवेत प्रदूषण आहे तसे राजकारणात आहे. काँग्रेसबरोबर गेले किवा उद्धव ठाकरे यांच्या नावाची चर्चा करून धूळफेक करण्याचे काम केले . भाजपच्या मांडीला मांडी लावून बसू शकत नाही, अजित पवार निधी देत नाही अशी अनेक कारणे ठाण्याची लोक देत आहे. शिवसेनेची वट आजही ठाण्यात आहे.

ठाणे शिवसेनेचा बालेकिल्ला आहे अबाधित राखण्याचे काम तुम्हाला करायचं आहे. भगव्यावर कोणतही चित्र छापू नका तो शिवरायांचा आहे तो पवित्र आहे तो तसाच फडकला पाहिजे. मशाल घेऊन पुढे चला मशालीच्या तेजाने सर्व जळमट जळून खाक होईल. इतरांनी जे केले ते तुम्ही करू नका.. निवडणूक आयोगावर न बोलेल चांगले, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वेगवान घडामोडी घडताना दिसत आहेत, पक्षांतराला देखील वेग आला आहे. महाविकास आघाडीमधील अनेक नेत्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी महायुतीमध्ये प्रवेश केला आहे, तर काही ठिकाणी अनेक जण आपल्या मित्र पक्षांमध्ये प्रवेश करताना दिसत आहेत. याचा सर्वाधित फटका हा महायुतीमध्ये शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाला बसला आहे, कारण आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या दोन्ही पक्षातील अनेक नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीमधील नेते देखील महायुतीमध्ये प्रवेश करताना दिसत आहेत, विधानसभा निवडूकीनंतर महाविकास आघाडीमधून महायुतीमध्ये इनकमिंग सुरू झालं होतं, हे इनकमिंग अजूनही सुरूच आहे.

## कच्च्या तेलाचे भाव वाढले




## महाराष्ट्र 'राजभवन; झाले आता 'लोकभवन'


दैनिक आपला विदर्भ


**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार महाराष्ट्र राजभवनचे नाव आता अधिकृतपणे 'महाराष्ट्र लोकभवन' असे करण्यात आले आहे. महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी या संदर्भात राजभवन सचिवालयाला निर्देश दिले आहेत.

राजभवन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि लोक कल्याणासाठी समर्पित करण्याच्या उद्देशाने हा निर्णय दिशादर्शक आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

'लोकभवन' म्हणून ओळखले जाणारे राजभवन आता केवळ राज्यपालांचे निवासस्थान व कार्यालय न राहता, राज्यातील नागरिक, समाजातील विविध घटक, विद्यार्थी, संशोधक, शेतकरी आणि नागरी संघटनांशी संवाद व सहभाग यांचे एक केंद्र व्हावे, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली.

'लोकभवन' हे सरकार आणि राज्यातील जनतेमध्ये सेवा, सहकार्य व संवादाचा सेतू व्हावे, हीच या नामांतरामागची भूमिका आहे, असे त्यांनी सांगितले.



'लोकभवन' केवळ संवैधानिक कर्तव्यांपुरते मर्यादित न राहता, समाजाच्या आशा, आकांक्षा आणि समस्यांप्रति संवेदनशील राहून त्यांच्याशी थेट नाते जपणारे खऱ्या अर्थाने लोकभवन असेल असे राज्यपालांनी स्पष्ट केले.

## भारतीय अर्थव्यवस्था वेगाने वाढतेय...

जगभरातील विलेषकांचे अंदाज चुकीचे ठरवत, भारतीय अर्थव्यवस्थेने जुलै ते सप्टेंबर या तिमाहीत ८.२ टक्के वाढीचा विक्रम प्रस्थापित केला. व्यापारयुद्ध, रशिया-युक्रेन युद्धासारख्या आर्थिक झळीच्या जागतिक वातावरणातही भारताला ही वृद्धी साधता आली, ती केवळ मोदी सरकारच्या अर्थधोरणातील सातत्यामुळेच! भारतीय अर्थव्यवस्थेने पुन्हा एकदा जगाला चकीत करण्याचे काम केले असून, भारताच्या वास्तविक 'जीडीपी'वाढीचा वेग ८.२ टक्के इतका नोंदवण्यात आला आहे. जुलै ते सप्टेंबर या तिमाहीत भारताने ही देदीप्यमान कामगिरी केली. हा तोच कालावधी आहे, ज्या कालावधीत अमेरिकी आयातशुल्काचा फटका भारताच्या वाढीला बसेल, असे भाकीत वर्तवले जात होते. तथापि, सर्व अर्थतज्ज्ञांच्या अंदाजांना फोल ठरवत, पुन्हा एकदा भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ठरली आहे. केंद्र सरकारचे त्याबद्दल सर्वप्रथम अभिनंदन. मागील तिमाहीचा विचार करता, तेव्हा ती ७.८ टक्के इतकी नोंदवली गेली होती. अर्थव्यवस्थेच्या वाढीचा हा विक्रम जागतिक आर्थिक मंदी, व्यापारसंघर्ष, निर्यात-विरोधी जागतिक आयातशुल्क इत्यादी कठीण परिस्थितींमध्येही भारताने नोंदवला. त्यामुळे तो अनन्यसाधारण महत्त्वाचा असाच. केंद्र सरकारची विकासाभिमुख धोरणे, ग्राहक विश्वास, देशांतर्गत बाजारपेठेत असलेली वाढती मागणी, उत्पादन तसेच सेवाक्षेत्रात होत असलेली मजबूत कामगिरी आणि याला जोड म्हणून सरकारचा दीर्घकालीन दृष्टिकोन हा विकासाला सर्वस्वी चालना देणारा ठरला आहे.जागतिक अनिश्चितता कायम असतानाही, भारताच्या वाढीचे चालक नेमके कोणते घटक ठरले, हे म्हणूनच पाहावे लागेल. या तिमाहीत, उत्पादन (मॅन्युफॅक्चरिंग) क्षेत्र ९.१ टक्क्यांनी, बांधकाम क्षेत्र ७.२ टक्क्यांनी वाढले असून, सेवाक्षेत्र यात वित्तीय सेवा, रिअल इस्टेट, व्यावसायिक सेवा यांचा समावेश होतो, त्यांतही १०.२ टक्क्यांची मजबूत वाढ नोंदवण्यात आली. याचाच अर्थ, भारतातील उत्पादन-सेवा नकारात्मक जागतिक वातावरणात टिकली असे नाही, तर ती वाढीच्या मार्गावर आहे. या विविध क्षेत्रांचा समन्वय आणि संतुलित वाढ हेच या 'जीडीपी'वाढीचे मुख्य कारण. त्याचबरोबर घरगुती ग्राहक खर्चात झालेली वाढ आणि जोरदार मागणी हेही तिला बळ देणारे घटक ठरले. भारतात सुमारे ५०-६० टक्के अर्थव्यवस्था घरगुती मागणीवर अवलंबून असते; त्यामुळे ग्राहकांचा आत्मविश्वास व खर्च वाढणे म्हणजे संपूर्ण अर्थव्यवस्थेला गती मिळणे, असाच स्पष्ट होतो. तसेच केंद्र सरकारने ज्या करसुधारणा राबविल्या, त्याचे सकारात्मक प्रतिबिंब वाढीत लख्खपणे उमटलेले दिसून येते. या तिमाहीच्या अखेरीस काही वस्तू आणि सेवांवर 'जीएसटी' दर कमी करण्यात आले, त्यामुळे ग्राहक वाढीस चालना मिळाली. ही कपात हे धोरणात्मक पाऊल तर ठरले, तसेच सेवाभावाचा संदेशही त्यातून गेला. त्यामुळे महागाई कमी होण्याबरोबरच खरेदी व मागणीत वाढ झाली.सरकारने सार्वजनिक भांडवली खर्च विक्रमी वाढवला आहे. त्यामुळे बांधकाम, पायाभूत सुविधा आणि उद्योगांना चालना मिळाली आहे. याव्यतिरिक्त, आर्थिक सुधारणांमुळे उद्योग-संस्था चालवण्यास (ईझ ऑफ डुईंग बिझनेस), उत्पादन वाढीस, बँकिंग संस्था व गुंतवणूकदारांचा विश्वास वाढण्यास मदत झालेली दिसून येते. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हेच विशेषत्वाने नमूद केले होते, हे लक्षात घ्यायला हवे. गेल्या वषच्या तुलनेत झालेली ही वाढ लक्षणीय अशीच. महागाईचा प्रभाव कमी असल्याने, वास्तविक वाढ अधिक स्पष्टपणे दिसून येते, असेही म्हणता येईल. दिवाळीच्या हंगामात भारतात सहा लाख कोटींची उलाढाल झाली. त्याचे प्रतिबिंब पुढील तिमाहीत दिसून येईल. विशेष म्हणजे, या तिमाहीत जागतिक पातळीवर अनेक नकारात्मक घटक होते. व्यापारयुद्ध, वाढलेले अमेरिकी आयातशुल्क, ऊर्जामूल्यांमध्ये अस्थिरता, रशिया-युक्रेन युद्धाचे आर्थिक परिणाम यांचा त्यात समावेश करता येईल. अशा परिस्थितीत अनेक देश मंदीच्या छायेत आले. मात्र, भारताने या कारणांना निष्क्रिय करण्याचे काम केले. अर्थात, याचेच आश्चर्य विलेषकांना वाटते.अमेरिकेने आयातशुल्क वाढवले, त्यावेळी भारताने निर्यातीसाठी नवनवीन बाजारपेठा शोधल्या आणि निर्यातवाढीकडे लक्ष दिले. तसेच, जागतिक अस्थिरतेच्या कालखंडातही देशांतर्गत मागणी, उत्पादन, सेवा आणि गुंतवणुकींनी भरभराट केली. हेच भारताच्या आर्थिक लवचिकतेचे प्रतीक ठरत आहे. असेही म्हणता येईल की, भारताने आंतरराष्ट्रीय अवलंबित्व कमी करत, आत्मनिर्भर अर्थव्यवस्था उभारली असून, त्याची गोमटी फळे आज भारताला मिळत आहेत. त्याचबरोबर धोरणात्मक स्थिरता, विश्वास आणि जनसहभाग हे केंद्र सरकारला बळ देणारे ठरत आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेने जी वाढ नोंदवली आहे, त्या वाढीमागे हीच धोरणात्मक स्थिरता कारण आहे. उद्योग, निर्माण, सेवा या क्षेत्रांमध्ये 'ईझ ऑफ डुईंग बिझनेस' आणण्यासाठी प्रयत्न झाले. त्यामुळे नवीन गुंतवणुकीला, रोजगाराला व उत्पादनाला चालना मिळाली. कृषी क्षेत्र हे तुलनेने कमी वेगाने वाढणारे असले, तरी यात सुमारे ३.५ टक्के वाढ झाली आहे. उत्पादन व सेवाक्षेत्रातील वाढ, मध्यमवर्गाची वाढती संख्या ग्राहकांच्या क्रयशक्तीतही वाढ करणारी ठरत आहे. विशेष म्हणजे, शहर आणि ग्रामीण अशा दोन्ही भागांत ती दिसून येते. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे, व्यापारी, उद्योगपती, उपभोक्ता, बँक-वित्त संस्था या सर्वांचा आत्मविश्वास वाढीस लागला आहे.विरोधकांनी अमेरिकेचे आयातशुल्क, जागतिक अस्थिरता तसेच आंतरराष्ट्रीय दबाव यांचा भारतावर परिणाम होईल, असे भाकीत केले होते. राहुल गांधींसारख्यांना तर ट्रम्प यांच्या 'डेड इकोनॉमी' या भारताला उद्देशून केलेल्या टिप्पणीमुळे आनंदाच्या उकळ्या फुटल्या होत्या. पण, आज प्रत्यक्ष जाहीर झालेले अधिकृत आकडे, अर्थव्यवस्थेचे स्थैर्य आणि वाढ ही याच विरोधकांसाठी आणि भारताला कमी लेखणाऱ्या ट्रम्प यांच्यासाठीही एक सणसणीत चपराक ठरली आहे. या वाढीचा परिणाम केवळ उत्पादन, सेवा क्षेत्रापुरता मर्यादित नाही; तो आर्थिक विश्वास, गुंतवणूकधारकांची धारणा आणि शेअर बाजार यांवरही दिसून येतो. कारण, अर्थव्यवस्था एकटी वाढत नाही. ग्राहकखर्च, उत्पादन, सेवा व गुंतवणुकाही वाढतात; तेव्हा कंपन्यांचे महसूल, नफा आणि विस्तार योजना यांच्यातही वाढ होते. परिणामी, शेअर-बाजारात सकारात्मक परिणाम दिसून येतात.एकूणच या वाढीने हे दाखवले की, भारताची वाढ व्यापक आहे. दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी हे योग्य वातावरण आहे. अर्थवृद्धीची हीच गती कायम राहिली, तर करसुधारणा, सार्वजनिक व खासगी गुंतवणूक, कृषी व ग्रामीण विकास, रोजगार, सेवा व उत्पादन यांचे संतुलन भारताचा पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था होण्याचा मार्ग प्रशस्त करतील, यात कोणताही संदेह नाही.

# नाशिक महापालिकेचा 'क्लीन गोदावरी बॉण्ड' राष्ट्रीय शेअर बाजारात सूचीबद्ध

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** ''दक्षिण गंगा असलेल्या गोदावरीच्या स्वच्छतेसाठी नागरिक आणि गुंतवणूकदारांनी जसा उत्स्फूर्त सहभाग दिला आहे, तो अत्यंत कौतुकास्पद आहे. 'विकास भी, विरासत भी' हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संदेश आम्हाला म ार्गदर्शक आहे. कुंभमेळ्याचे पावित्र्य टिकवून विकासासोबत ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यात येईल'', असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

राष्ट्रीय शेअर बाजारात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नाशिक महापालिकेचा 'क्लीन गोदावरी बॉण्ड' समारंभपूर्वक सूचीबद्ध करण्यात आला. या कार्यक्रमास मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ.



के.एच. गोविंदराज, नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे व्यवस्थापकीय संचालक आशिष चौहान, ' मित्रा' चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह आणि नाशिक महानगरपालिका आयुक्त म निषा खत्री उपस्थित होत्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कुंभमेळ्यासाठी विकासकामे होत असून राज्य शासनाने नगर विकास विभागामार्फत कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक असलेली अनेक पायाभूत कामे हाती घेतली असून कुंभमेळ्याचे पावित्र्य कायम राखत विकास पुढे नेला जाईल. यासाठी अनेक योजना तयार केल्या असून कार्यान्वित करण्यात येत आहे. हे करताना, प्रधानमंत्री मोदी यांनी नाविन्यपूर्ण विचार आणि वित्तीय सक्षमतेतूनच योजना पुढे जातील. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकच्या पायाभूत सुविधांच्या विकासात नाशिक म हानगरपालिका महत्त्वाची भूमिका बजावत आहे. नाशिक परिसरात म ोठ्या प्रमाणावर विकासकामांची संधी उपलब्ध होत असून, या भागात रामाचे वास्तव्य, सीताहरण रामायणकालीन उल्लेखाबाबत या स्थळांचे महत्त्व आहे. या माध्यमातून जीवनदायीनी गोदावरीच्या स्वच्छतेसाठी महत्त्वपूर्ण काम होत आहे. असल्याचे त्यांनी नमूद केले.

**गुंतवणूकदारांचा प्रचंड प्रतिसाद**

मुख्यमंत्री म्हणाले, यापूर्वी पुणे आणि पिंपरी-चिंचवड म हानगरपालिकांनीही खुल्या वित्तीय बाजारातून बॉण्डद्वारे निधी उभारला आहे. नाशिक महानगरपालिकेच्या 'क्लीन गोदावरी बॉण्ड'ला गुंतवणूकदारांकडून सबस्क्रिप्शनसाठी मिळालेला चौपट प्रतिसाद ही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आर्थिक सक्षमता, रेटिंग आणि पारदर्शक प्रक्रियेची पावती आहे. राज्यातील १५ महानगरपालिका अशा क्षमतेच्या असून नियमन प्रक्रियेतून विशिष्ट पात्रता आणि नियामक मान्यता पूर्ण करून विकासासाठी निधी उभारू शकतात, असे फडणवीस यांनी सांगितले.

खुल्या बाजारातून उभारलेल्या निधीच्या आधारे केंद्र सरकारकडून पायाभूत विकासासाठी मिळणाऱ्या निधीचा मार्गही सुलभ झाला आहे. तसेच एनएसई प्रक्रियेमुळे २६ कोटी रुपये प्रोत्साहन निधी मिळणार असून याद्वारे महानगरपालिकेवरील व्याजभार शून्य टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतो, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

या प्रसंगी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ''ऊर्जा क्षेत्रातील महत्त्वाच्या कंपन्यांच्या क्षम तेस चालना देण्यासाठी नॅशनल स्टॉक एक्सचेंजच्या माध्यमातून व्यापक प्रम ाणात निधी उपलब्ध होईल. पहिल्या टप्प्यात महापारेषण (चडएढउङ), त्यानंतर महावितरण आणि महानिर्मिती या देशातील मोठ्या वीज कंपन्यांचे सूचीबद्ध करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. या प्रक्रियेसाठी नॅशनल स्टॉक एक्सचेंजच्या अनुभवाची मोठी मदत ठरेल''असेही त्यांनी स्पष्ट केले.

## दिल्लीनंतर १२० बहादूर राजस्थानमध्येही करमुक्त, फरहान अख्तरनं मुख्यमंत्र्यांचे मानले आभार...

**मुंबई/प्रतिनिधी :** एक्सेल एंटरटेनमेंट आणि ट्रिगर हॅपी स्टुडिओजचा १२० बहादूर अखेर थिएटरमध्ये प्रदर्शित होण्यासाठी सज्ज आहे. १२० बहादूर चित्रपटाबाबत आता एक बातमी समोर आली आहे. अलीकडेच दिल्लीत या चित्रपटाला करमुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. आता हा चित्रपट राजस्थानमध्येही करमुक्त करण्यात आला आहे. फरहान अख्तरनं त्याच्या एक्स हँडलवर राजस्थानमध्ये चित्रपटाच्या करमुक्त दर्जाची घोषणा करताना लिहिलं आहे की, मेजर शैतान सिंग भाटी (पीव्हीसी) आणि चार्ली कंपनीच्या प्रत्येक सैनिकाच्या असाधारण धैर्याला श्रद्धांजली वाहणाऱ्या या सन्माननीय कृतीबद्दल आम्ही राजस्थानचे माननीय मुख्यमंत्री श्री भजनलाल शर्माजी यांचे मनापासून आभार मानतो.

१२० बहादूर ही शूर सैनिकांच्या बलिदानाची कथा आहे, जो माघार घेण्यास नकार देतो आणि देशाचे रक्षण करण्याचा निर्णय घेतो. तो अखेरच्या श्वासापर्यंत शत्रू सामना करतो. ही एक शक्तिशाली आणि महत्त्वाची कथा आहे, जी प्रत्येक भारतीयाने पाहिली पाहिजे. म्हणूनच हा चित्रपट अनेक राज्यांमध्ये करमुक्त केला जात आहे. दिल्लीनंतर, आता राजस्थानमध्येही करमुक्त करण्यात आला आहे. आपल्या सैनिकांची धाडस आणि बलिदानाची कहाणी या चित्रपटामध्ये प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. चित्रपटामध्ये १२० बहादूर १९६२च्या युद्धादरम्यान रेझांग लाच्या प्रसिद्ध लढाईत भाग घेतलेल्या १३ व्या कुमाऊं रेजिमेंटच्या, १२० भारतीय जवानांच्या अफाट शौर्याचे चित्रण करते. फरहान अख्तर मेजर शैतान सिंग भाटी, पीव्हीसीची भूमिका करतो, जो त्याच्या साथीदारांसह भारतीय सैन्याच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाच्या लढाईंपैकी सर्व अडचणींविरुद्ध खंबीरपणे उभा राहतो.या चित्रपटामध्ये फरहान अख्तरचा एक डायलॉग खूप दमदार आहे हम पीछे नहीं हटेंगे. हा चित्रपट रजनीश रेजी घोष यांनी दिग्दर्शित केला आहे आणि रितेश सिधवानी, फरहान अख्तर (एक्सेल एंटरटेनमेंट) आणि अमित चंद्रा (ट्रिगर हॅपी स्टुडिओ) यांनी निर्मिती केली आहे. या चित्रपटामध्ये फरहान अख्तरबरोबर राशी खन्ना, अंकित सिवाच, विवान भठेना, अजिंक्य देव, आशुतोष शुक्ला, साहिब वर्मा आणि थुतान गोम्बू हे स्टार आहेत.

# आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिनाचे समाजशास्त्रीय चिंतन

समाज ही केवळ लोकांची रचना नसून, तिच्या प्रत्येक घटकाच्या सहभागावर आधारित एक सजीव प्रणाली आहे, जिथे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनमानाचा स्तर, संधी, अधिकार आणि सामाजिक प्रतिष्ठा त्याच्या शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीवर अवलंबूनअसते. या दृष्टीने पाहिल्यास, अपंग व्यक्तींचा अनुभव केवळ वैयक्तिक अडचणींचा विषय नसून तो संपूर्ण समाजाच्या मानसिकता, मूल्य प्रणाली, धोरणे आणि व्यवहार यांचे प्रतिबिंब आहे. दरवर्षी ३ डिसेंबर रोजी साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिन हा दिवस केवळ जागरूकता निर्माण करण्यापुरताच नाही, तर तो समाजातील समावेशी धोरणांचा विचार करण्याचा, अपंग व्यक्तींच्या जीवनातील अडचणी ओळखण्याचा, त्यांना समान संधी उपलब्ध करून देण्याचा आणि समाजातील नकारात्मक दृष्टिकोन बदलण्याचा महत्त्वपूर्ण प्रसंग आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून, अपंग व्यक्ती ही एक सामाजिक गट म्हणून दिसते, ज्यांच्यावर शारीरिक, मानसिक किंवा अन्य अडचणींमुळे अनेक स्तरांवर भेदभाव होतो, आणि त्यांच्या सामाजिक सहभागाला मर्यादा येतात. शिक्षणाच्या क्षेत्रात, अपंग व्यक्तींना अनेकदा विशेष शैक्षणिक साधने, समायोजने आणि सहाय्य उपलब्ध नसते, ज्यामुळे त्यांचे बौद्धिक, कौशल्यात्मक आणि सामाजिक विकासावर थेट परिणाम होतो. याचा प्रभाव भविष्यातील रोजगाराच्या संधींवर, आर्थिक स्वावलंबनावर, आत्मसन्मानावर आणि समाजातील प्रतिष्ठेवर पडतो. रोजगार क्षेत्रातही अपंग व्यक्तींना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते, जसे की कार्यक्षेत्रात आवश्यक सुविधा न मिळणे, अपंगतेवर आधारित पूर्वग्रह, किंवा त्यांच्या क्षमतांबाबत चुकीची समजुती निर्माण करणे. याचा थेट परिणाम त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर, सामाजिक सहभागावर आणि मानसिक स्वास्थ्यावर होतो.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे स्पष्ट होते की अपंग व्यक्तींच्या जीवनातील ह्या अडचणी केवळ वैयक्तिक नसून त्या समाजाच्या मानसिकता, मूल्ये, धोरणे आणि



सामाजिक संरचना यांच्याशी संबंधित आहेत. अपंग व्यक्तींच्या जीवनात करुणा, दया, उपेक्षा किंवा अस्वीकृतीची भावनाही समाजातील अपूर्ण मानसिक प्रतिमांनाचे प्रतीक आहे. जर समाजाने अपंग व्यक्तींविषयी सकारात्मक दृष्टिकोन ठेवला, त्यांना योग्य संधी उपलब्ध करून दिल्या, सार्वजनिक जागांमध्ये सुलभता निर्माण केली आणि शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमात समावेश केला, तर समाजाच्या नैतिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीला मोठा गती मिळेल. अपंग व्यक्तींचा सामाजिक सहभाग मर्यादित असल्यास त्यांच्या अनुभवांचा, मतांचा आणि कल्पनांचा समाजाच्या निर्णय प्रक्रियेत समावेश होत नाही, ज्यामुळे संपूर्ण समाजाच्या प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होतो.

सामाजिक समावेश, समान संधी, सार्वजनिक स्वीकृती आणि न्याय यासाठी धोरणात्मक उपाय करणे ही फक्त नैतिक जबाबदारी नसून समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अत्यावश्यक आवश्यकता आहे. अपंग व्यक्तींना समान अधिकार आणि संधी उपलब्ध करून दिल्यास, ते केवळ स्वतःच्या जीवनात उन्नती करतात, तर समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान देतात. अपंग व्यक्तींच्या अडचणी शारीरिक, मानसिक किंवा संवेदनशीलता यांच्या पलीकडे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्तरावर प्रतिबिंबित होतात. सामाजिक जीवनात त्यांच्या सहभागाची मर्यादा असल्यास, समाजाच्या निर्णय प्रक्रियेत त्यांच्या अनुभवांचा आणि दृष्टिकोनांचा समावेश होत नाही, ज्याचा परिणाम संपूर्ण सामाजिक प्रगतीवर होतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून असे लक्षात येते की अपंग व्यक्तींच्या अडचणींचे निराकरण ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. योग्य शिक्षण, रोजगार, आरोग्य सेवा, सार्वजनिक सुविधा, सामाजिक जागरूकता आणि समावेशी धोरणे या माध्यमातूनच अपंग व्यक्तींच्या जीवनात सुधारणा घडवता येते.

जगातील अनेक देशांनी अपंग व्यक्तींना समान संधी आणि अधिकार सुनिश्चित करणारे कायदे लागू केले आहेत, परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी, समाजाची मानसिकता बदलणे आणि सार्वजनिक स्वीकृती सुनिश्चित करणे हेच खरे उपाय ठरतात. अपंग व्यक्तींच्या जीवनातील अडचणींचा अभ्यास केवळ त्यांच्या अडचणी ओळखण्यापुरताच मर्यादित राहणार नाही, तर समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून त्यावर उपाय सुचवणे, सामाजिक समज वाढवणे आणि समावेशी समाज घडविणे आवश्यक आहे. अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणा ही केवळ त्यांच्या स्वतः साठी नाही, तर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. यासाठी शासन, शाळा, रोजगार क्षेत्र, समुदाय, कुटुंब आणि प्रत्येक नागरिकाचे सकारात्मक योगदान आवश्यक आहे. अपंग व्यक्तींना समान अधिकार, संधी आणि सार्वजनिक स्वीकृती उपलब्ध झाल्यास, ते स्वतःच्या जीवनात उन्नती करतात आणि समाजाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि नैतिक प्रगतीतही मोलाचे योगदान देतात.

समाजातील समावेश, सामाजिक न्याय, समान संधी आणि सर्वांगीक विकासासाठी अपंग व्यक्तींच्या जीवनमानातील सुधारणा ही अत्यंत गरजेची बाब आहे. सामाजिक अडथळे दूर करून, समान संधी, समावेश आणि सामाजिक स्वीकृती मिळवून देणे हाच खरा सामाजिक विकास मानला जातो. अपंग व्यक्तींच्या अडचणी दूर करण्यासाठी सामाजिक अभियान, सार्वजनिक धोरणे, सामूहिक चर्चासत्रे, शैक्षणिक कार्यक्रम आणि माध्यमांतून जनजागृती करणे आवश्यक आहे. हे उपाय फक्त कागदोपत्री नसून प्रत्यक्ष सामाजिक बदल घडवू शकतात. समाजातील प्रत्येक घटकाचे जीवन सन्माननीय असावे, सर्वांना समान संधी मिळाव्यात आणि अपंग व्यक्तींच्या जीवनात सुधारणा घडवून आणणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. अपंग व्यक्तींच्या जीवनातील अडथळे दूर करणे आणि त्यांना समान संधी देणे हे समाजाची नैतिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगती सुनिश्चित करते.

३ डिसेंबर हा दिवस फक्त स्मरणार्थ किंवा जागरूकतेसाठी नाही, तर तो समाजातील प्रत्येक घटकाला विचार करण्याची, आपले मानसिक प्रतिमान बदलण्याची, आणि समावेशी धोरणे अंगीकारण्याची संधी देतो. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणा हा प्रश्न समाजाच्या सर्व घटकांशी संबंधित आहे. अपंग व्यक्तींना समान संधी, स्वातंत्र्य, आणि सामाजिक स्वीकृती दिल्यास, ते स्वतःच्या जीवनात उन्नती करतात आणि समाजाच्या सर्वांगीक प्रगतीतही महत्त्वपूर्ण योगदान देतात. त्यामुळे आजच्या आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिनानिमित्त समाजातील प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या मानसिकतेचा आढावा घ्यावा, अपंग व्यक्तींविषयी संवेदनशीलता वाढवावी, आणि त्यांना समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात संधी देण्यासाठी प्रयत्न करावे. अपंग व्यक्तींच्या समस्यांचे निराकरण करणे, त्यांना समान अधिकार, संधी, आणि सामाजिक स्वीकृती मिळवून देणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नाही, तर समाजाच्या नैतिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि सामाजिक प्रगतीसाठी अनिवार्य आहे.



आजही अनेक ठिकाणी अपंग व्यक्तींवर विविध स्वरूपातील भेदभाव दिसून येतो; सामाजिक समावेश, समान संधी आणि सार्वजनिक स्वीकृतीची गरज अजूनही पूर्ण झालेली नाही. त्यामुळे अपंग व्यक्तींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक सहभागाला चालना देणे, त्यांच्या अधिकारांसाठी लढणे, आणि समाजातील नकारात्मक दृष्टिकोन बदलणे हे केवळ आव्हान नाही, तर सामाजिक जबाबदारी आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केल्यास, अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणा ही केवळ त्यांची समस्या नाही, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे, आणि त्यासाठी प्रत्येक घटकाला शासन, शाळा, कामकाजाचे ठिकाण, समुदाय आणि कुटुंब सकारात्मक भूमिका पार पाडणे आवश्यक आहे.

अपंग व्यक्तींना समान संधी, स्वातंत्र्य आणि सामाजिक स्वीकृती मिळाल्यास, ते स्वतःच्या जीवनात उन्नती करतात आणि समाजाच्या सर्वांगीक प्रगतीतही मोलाचे योगदान देतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, अपंग व्यक्तींच्या जीवनातील सुधारणेचा प्रश्न हा संपूर्ण समाजाच्या प्रगतीशी जोडलेला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय अपंग व्यक्ती दिन फक्त स्मरणार्थ दिवस नाही, तर तो समाजाला सुधारणा घडविण्यासाठी, सकारात्मक दृष्टिकोन अंगीकारण्यासाठी, आणि अपंग व्यक्तींना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रेरित करणारा एक महत्त्वपूर्ण दिन आहे. समाजातील अपंग व्यक्तींच्या अडचणी दूर करून त्यांना समान संधी, समावेश आणि सामाजिक स्वीकृती मिळवून देणे हाच खरा सामाजिक विकास आणि मानवतेची खरी कसोटी आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. ९९६०१०३५८२**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# ६ डिसेंबरला मुंबईला येण्यासाठी धावणार १२ विशेष लोकल, मध्य रेल्वेचे संपूर्ण वेळापत्रक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या दिवशी अर्थात ६ डिसेंबरच्या दिवशी मुंबई उपनगरांतून दादरला जाणाऱ्या प्रवाशांसाठी रेल्वेने विशेष लोकल चालवण्याचा निर्णय घेतला आहे. ६ डिसेंबरच्या मध्यरात्री परळ- कल्याण आणि कुर्ला- वाशी पनवेल मार्गावर विशेष लोकल चालवल्या जाणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. नेमक्या कोणत्या वेळांमध्ये या लोकल चालवल्या जाणार आहेत. जाणून घेऊया...



५ डिसेंबर आणि ६ डिसेंबरच्या मध्यरात्री दादरकरिता प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी ही विशेष सोय मध्य रेल्वेने केली आहे. अनेक भीम अनुयायी ५ डिसेंबर आणि ६ डिसेंबरच्या मध्यरात्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी दादरच्या चैत्यभुमीवर दाखल होतात. त्यांची गैरसोय टाळण्यासाठी रेल्वेचे मुंबई मंडळ विशेष रेल्वे सोडणार आहे. जेणेकरून प्रवाशांना सुविधा उपलब्ध होईल. उपनगरीय विशेष लोकल सर्व स्थानकांवर थांबणार आहेत. अर्थात धीम्या मार्गावर या लोकल चालवल्या जाणार आहेत.

५ डिसेंबर आणि ६ डिसेंबरच्या मध्यरात्री दादर स्थानकाकरिता मध्यरात्री परळ- कल्याण आणि कुर्ला- वाशी पनवेल मार्गावर १२ अतिरिक्त विशेष लोकल चालवल्या जाणार आहेत. कुर्ला- परळ ही विशेष लोकल, कुर्ला स्थानकावरून मध्यरात्री १२.४५ वाजता सुटेल आणि परळ स्थानकावर ०१.०५ मिनिटांनी पोहोचेल. कल्याण- परळ ही विशेष लोकल, कल्याण स्थानकावरून ०१.०० वाजता सुटेल आणि परळ स्थानकावर ०२.२० वाजता पोहोचेल. ठाणे- परळ ही विशेष लोकल, ठाणे स्थानकावरून ०२.१० वाजता सुटेल आणि परळ स्थानकावर ०२.५५ मिनिटांनी पोहोचेल.

परळ- ठाणे ही विशेष लोकल, परळ स्थानकावरून मध्यरात्री ०१.१५ वाजता सुटेल आणि ठाणे स्थानकावर मध्यरात्री ०१.५५ वाजता पोहोचेल. परळ- कल्याण ही विशेष लोकल, परळ स्थानकावरून मध्यरात्री ०२.३० वाजता सुटेल आणि कल्याण स्थानकावर ०३.५० वाजता पोहोचेल. परळ- कुर्ला परळ स्थानकावरून ०३.०५ वाजता सुटेल आणि कुर्ला स्थानकावर ०३.२० वाजता पोहोचेल. विशेष लोकल फक्त मध्य रेल्वेवरच नाही तर, हार्बर रेल्वे मार्गावरही चालवली जाणार आहे. कुर्ला ते वाशी- पनवेल मार्गावर ही विशेष लोकल चालवली जाणार आहे.

वाशी- कुर्ला ही विशेष लोकल, वाशी स्थानकावरून मध्यरात्री ०१.३० वाजता सुटेल आणि कुर्ला स्थानकावर मध्यरात्री ०२.१० वाजता पोहोचेल. पनवेल- कुर्ला ही विशेष लोकल, पनवेल स्थानकावरून मध्यरात्री ०१.४० वाजता सुटेल आणि कुर्ला स्थानकावर मध्यरात्री ०२.४५ वाजता पोहोचेल. वाशी- कुर्ला ही विशेष लोकल, वाशी स्थानकावरून मध्यरात्री ०३.१० वाजता सुटेल आणि कुर्ला स्थानकावर मध्यरात्री ०३.४० वाजता पोहोचेल. तर, डाऊन मार्गासाठी, कुर्ला- वाशी ही विशेष लोकल, कुर्ला स्थानकावरून मध्यरात्री ०२.३० वाजता सुटेल आणि वाशी स्थानकावर मध्यरात्री ०३ वाजता पोहोचेल. कुर्ला – पनवेल ही विशेष लोकल, कुर्ला स्थानकावरून मध्यरात्री ०३ वाजता सुटेल आणि पनवेल स्थानकावर मध्यरात्री ०४ वाजता पोहोचेल. कुर्ला – वाशी ही विशेष लोकल, कुर्ला येथून ०४ वाजता सुटेल आणि वाशी स्थानकावर मध्यरात्री ०४.३५ वाजता पोहोचेल.

## नाशिकचा खरा पालकमंत्री मीच अजित पवारांच्या वक्तव्याला दानवेंचं प्रत्युत्तर

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी पाहायला मिळत आहेत. यातच नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी (२ डिसेंबर) मतदान पार पडत आहे. या नगरपरिषदेच्या निवडणुकीत महायुतीमधील पक्ष अनेक ठिकाणी आमने-सामने आले होते. त्यामुळे या निवडणुकीत मोठी रंगत पाहायला मिळाली.

दरम्यान, एका सभेत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नाशिकच्या पालकमंत्री पदाबाबत मोठे भाष्य केले होते. त्यांच्या या विधानानंतर भारतीय जनता पक्षाचे नेते रावसाहेब दानवे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. 'नाशिकचा खरा पालकमंत्री मीच', असं अजित पवार यांनी म्हटले होते. त्यांच्या या विधानावर बोलताना रावसाहेब दानवे यांनी म्हटले की, 'राज्याचे पालकमंत्री फक्त देवेंद्र फडणवीस हेच आहेत.'

अजित पवार यांनी काय म्हटले होते?

नाशिकमधील एका सभेत बोलताना अजित पवार म्हणाले होते की, मी तुमच्या डीपीसीला देखील मदत करेन. अजून तुमचा पालकमंत्री नेमलेला नाही. मीच तुमचा पालकमंत्री आहे असे समजा आणि तुम्ही काही काळजी करू नका', असं अजित पवारांनी म्हटले होते.

रावसाहेब दानवे काय म्हणाले?

राज्याचे पालकमंत्री खरे देवेंद्र फडणवीस हेच आहेत. पण त्यानंतरही जर कोणी स्वत:ला पालकमंत्री म्हणत असतील तर त्यांची काही चूक नाही. मंत्री हे मंत्रीच आहेत, त्यांच्या त्यांच्या खात्याचे ते मंत्री म्हणजे पालकच आहेत. मात्र, या राज्याचं पालकमंत्री कोण असेल तर ते फक्त देवेंद्र फडणवीस आहेत, असं रावसाहेब दानवे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले आहे.

## महाराष्ट्रात मतदानाच्या दिवशी पहिल्यांदाच घडलं, भाजपवर गंभीर आरोप, लातूरमध्ये कडकडीत बंद

**लातूर/प्रतिनिधी :** राज्यभरात नगर पंचायत आणि नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी मतदान सुरू आहे. पण, अनेक ठिकाणी बोगस मतदार आणि मारहाणीच्या घटना घडल्या आहे . तर लातूर जिल्ह्यातील निलंगा नगर परिषद निवडणूक ही भाजपचा सांगण्यावरूनच स्थगित करण्यात आल्याचा काँग्रेससह इतर पक्षांनी आरोप केला आहे. त्यामुळे मतदानाच्या दिवशीच निलंगा बंदची हाक देण्यात आली होती. ऐन मतदानाच्या दिवशी निलंगामध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला आहे. आजच्या निलंगा बंदला मोठा प्रतिसाद मिळाला. अनेक व्यापाऱ्यांनी आपली दुकानं, प्रतिष्ठानं बंद ठेवून काँग्रेसच्या या बंदमध्ये आपला सहभाग नोंदवला. निलंगा नगरपरिषद निवडणुकीला स्थगिती पराभव पुढे दिसत असल्यामुळे ही निवडणूक स्थगित करण्याचा घाट भाजपने घातल्याचा आरोप काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांनी पत्रकार परिषदेमध्ये केला. तसंच ही निवडणूक स्थगित करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी ही षडयंत्र असल्याचा आरोप काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांनी केला आहे.

दरम्यान, काँग्रेसचे नेते अमित देशमुख यांनी या घटनेवर तीव्र निषेध व्यक्त केला आहे. मतदानाला १२-१४ तास शिल्लक असताना लातूर जिल्ह्यातील निलंगा नगरपरिषद निवडणुकीला स्थगिती देण्याचा निर्णय अनाकलनीय आणि धक्कादायकआहे. निवडणूक आयोगाची ही कृती जनतेच्या मतदान अधिकारावर गदा आणणारी आणि लोकशाहीविरोधी आहे. महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मागच्या नऊ ते दहा वर्षापासून झालेल्या नाहीत, राज्यातील सत्ताधारी मंडळींना प्रशासनाच्या माध्यमातून एकाधिकारशाही गाजवता यावी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुका या ना त्याकारणाने लांबवण्याचा प्रयत्न होतो आहे, अशी प्रतिक्रिया देशमुख यांनी दिली.

## चाईल्ड हेल्पलाईनमुळे अल्पवयीन बालविवाह रोखला

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** चाईल्ड हेल्पलाईन १०९ या टोल फ्री क्रमांकावर मिळालेल्या माहितीनुसार २ डिसेंबर रोजी अल्पवयीन बालिका वय १७ वर्षे १ माहिने रा. विक्रमनगर, ता.करवीर, जि. कोल्हापूर हिचा बाल विवाह किरण सावळू बागडी, मु.पो. दडडी मुदगे, ता. हुक्केरी, जि. बेळगाव वय २५ वर्षे याच्या सोबत सायंकाळी ५ वाजता र्त्यंबोली हॉल, विक्रमनगर येथे बाल विवाह होणार असल्याबाबत माहिती प्राप्त झाली होती.

त्यानुसार श्रीम. निवेदिता महाडिक, बाल विकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्षातील महेंद्र कांबळे, अभिजित पाटील, अंगणवाडी सेविका गायत्री कुराडे व वैशाली कांबळे यांनी घटनास्थळी भेट दिली. बालिकेच्या जन्म दाखल्याच्या नोंदणीनुसार वयाची शहानिशा करुन बाल विवाह रोखण्यात आला. अल्पवयीन बालिका बाल कल्याण समिती समोर सादर करून बालिकेस बालगृहात दाखल करण्यात आले. या प्रकरणी एस.एस. वाईगडे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, श्रीम. अश्विनी खाडे व श्रीम. पद्मजा गारे सदस्या, बाल कल्याण समिती, एस. एन. दाते, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांचे विशेष सहकार्य लाभले.

## रस्त्याने चालतानाच प्रसूती वेदना, महिलेच्या मदतीसाठी देवासारखे धावून आले मुंबई पोलिस, फुटपाथवरच महिलेने दिला बाळाला जन्म

**मुंबई/प्रतिनिधी :** रस्त्याने चालत असताना अचानक महिलेला प्रसववदना सुरू झाली. वेदना सुरू झाल्यानंतर ती अचानक पदपथावर बसली. फुटपाथवर बसलेली ही महिला वेदनेने विव्हळत असल्याचे पोलिसांना कळताच त्यांनी त्या परिसरात धाव घेतली. पोलसांनी गर्भवती महिलेला रुग्णालयात नेण्याच्या हालचाली सुरू केल्या. मात्र तोपर्यंत तिच्या वेदना आणखी वाढल्या आणि तिथेच महिलेची प्रसुती झाली. मुंबईतील डोंगरी परिसरातील ही घटना आहे. धारावी येथे वास्तव्यास असलेली ३६ वर्षीय माला नाडर ही गर्भवती महिला पतीसोबत शनिवारी डोंगरी परिसरातून चालली होती. मात्र अचानक पोटात दुखू लागल्याने माला तिथेच असलेल्या फुटपाथवर बसल्या. त्यांना पुढे चालताही येईना. प्रसव वेदनेने विव्हळत असलेल्या महिलेला पाहिल्यानंतर स्थानिकांनी डोंगरी पोलिसांना याबाबत माहिती दिली. लगेचच डोंगरी पोलिसांच्या दोन गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. प्रसूती वेदना वाढत असल्याने महिलेला चालतादेखील येत नव्हते. त्यामुळं अशा परिस्थितीत तिला दुसरीकडे नेणे धोकादायक ठरू शकत होतं. त्यामुळं पोलिसांनी तिथेच तिची प्रसुती करायची ठरवली. पोलिस कॉन्स्टेबल खडसे यांनी चादर तसंच इतर वस्त्रांची व्यवस्था करत महिलेच्या चारही बाजूला आडोसा तयार करुन तिची प्रसूती करण्यात आली. महिला कॉन्सटेबलने देखील महिलेला मानसिक आधार देत मदत केली.

## कल्याणमध्ये जीममधील तरुणीवर लैंगिक अत्याचार करणारा जीम मालक अटकेत


दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** आपल्या जीममध्ये शरीर सुदृढतेसाठी येणाऱ्या एका पीडित तरूणीशी मैत्री करून तिला जीम मालकाने तिच्याशी मैत्री केली. तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर तिला लग्नाचे आमिष दाखवून नंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. या तरूणीचा मोबाईल हॅक करून त्यामधील अील प्रतिमा समाजमाध्यमांत प्रसारित करण्याची धमकी जीम मालक देऊ लागल्याने या तरूणीने खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. पोलिसांनी फरार असलेल्या या जीम मालकाला दीड महिन्यांनी अटक केली आहे.


विनीत गायकर (३४) असे या जीम मालकाचे नाव आहे. तो कल्याण पश्चिमेतील गायकर हाऊस येथे राहतो. आपणास अटक होऊ नये म्हणून या इसमाने पोलिसांवर राजकीय दबाव आणल्याची चर्चा आहे. पोलिसांनी विनीतला अटक केली. त्याला कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

खडकपाडा पोलिसांकडून मिळालेली माहिती, अशी की कल्याण पश्चिमेत एक २९ वर्षाची तरूणी आपल्या कुटुंबीयांसह राहते. शरीर सुदृढतेसाठी ती विनीत गायकर याच्या व्यायामशाळेत व्यायामासाठी सकाळ, संध्याकाळ जात होती. पीडित तरूणी दररोज व्यायामासाठी जीममध्ये येत होती. त्यामुळे तिची ओळख जीम मालक म्हणून विनीत याच्या बरोबर झाली. विनीतने या तरूणी बरोबरची ओळख वाढवली. तिच्या बरोबर मैत्री केली. त्याचे रूपांतर मग प्रेमात झाले. विनीतने पीडितेला आपण तुझ्या बरोबर लग्न करणार असल्याचे आमिष दाखवले.

पीडित तरूणी जीम मालकापासून सावध भूमिका घेऊन राहत होती. दरम्यानच्या काळात जीम मालक विनीतने पीडितेचा मोबाईलमध्ये तांत्रिक तोडमोड करून त्यामध्ये दोघांचे अलि दृश्यचित्रण केले. हे अलि दृश्यचित्रण समाज माध्यमांत आपण प्रसारित करून आपण तुझी बदनामी करू अशी धमकी पीडितेला देऊ लागला. यामुळे पीडिता घाबरली. या विषयावरून दोघांमध्ये भांडण झाले. हे अील चित्रण समाज माध्यमांत प्रसारित करण्याची धमकी देत जीम मालक पीडितेवर लैंगिक अत्याचार करू लागला. हे प्रकार असह्य झाल्याने अखेर गेल्या दीड महिन्यापूर्वी पीडितेने खडकपाडा पोलीस ठाण्यात जीम मालक विनीत गायकर याच्या विरूध्द लैंगिक अत्याचाराची तक्रार दाखल केली होती. आपल्या विरूध्द गुन्हा दाखल झाल्याचे समजताच विनीत फरार झाला होता. खडकपाडा पोलीस त्याच्या मागावर होते. दीड महिने शोध चालू असताना सोमवारी विनीत कल्याण पश्चिमेतील फडके मैदान भागात फिरत असल्याची माहिती मिळाल्यावर पोलिसांनी त्याला सापळा लावून अटक केली. पोलिसांनी या गुन्ह्याचा तपास सुरू केला आहे. आणखी असे काही प्रकार या इसमाने केले आहेत का याचा तपास पोलीस करत आहेत.



## शब्दकोडे क्र. 26



आडवे शब्द

१. '... दादा मला एक वहिनी अण' १०. विशेष १२. रात्रीचा पाऊस १३. उमर १४. वस्त्र, कापड १६. शेतकरी १७. युवती १८. बरगडी १९. घट्ट २१. घरातील वरचा भाग २२. कारभार, नस्ता उद्योग! २३. गाय २४. गोष्टीतील वनमानव (इंग्रेजी) २६. दगड, लाकूड यांचा पातळ २७. जनावर, माणूस इ. २८. पोशाख (अनेक वचन) ३०. वृद्धत्व, म्हातारपण ३१. जोराचा रट्टा ३२. पादत्राण ३४. पिशाच, वेडा मनुष्य ३६. बारीक झिणझिण ३८. अपऱ्या नाकाचा ४०. अविवेकी, अतिरेकी कृत्य ४१. दिखाऊ, वरवर ४२. पुरुष ४३. पाणी उकळण्याचा आवाज ४६. शिष्य ४८. बाजेची कापडी पट्टी ४९. घटस्फोट ५१. रोखलेली नजर ५२. मलई ५३. तफावत, अंतर ५५. पारंब्याचा एक वृक्ष ५६. शुल्क ५७. जेमतेम ५९. आश्चर्य ६१. लज्जास्पद ६२. अभिनेता ६३. हयगय, दुर्लक्ष ६४. नंतर ६५. च्या बरोबर ६७. भीमाजवळचे शास्त्र ६८. एक कालवण ६९. सहाय्यक ७१. मरणारा, प्रतिस्पर्धी ७२. महाभारतातील वास्तुशास्त्रज्ञ ७३. आपला नसलेला ७४. राजवाड्यातील दालन ७५. सोंग वठवणारा ७६. पद्धतीप्रमाणे ७७. बांबू

उभे शब्द

१. गौर वर्णाचा २. पद्धत ३. पणजीचे राज्य ४. पर्जन्यकाळ ५. डोळे ६. अत्यंत किंमतीची, मौल्यवान ७. पाताळ ८. सौन्याच्या मुक्कामाची जागा ९. शीर, धमनी ११. सर्वत्र, चोहीकडे १५. फायदा, तोटा १६. कमीत कमी १९. भांडण २०. गरजू २२. मेहरबानी २५. पाण्याचा उगम २६. केस २७. जीव २९. झटकम ३२. जुजबी ३३. अधाशी, लालची ३५. चालत चालत ३७. चुनखडीचा दगड ३९. वात्रट, चावट ४३. जाडसर पीठ ४४. शेंगेवरील साल ४५. शेवट, अखेर ४६. कैद ४७. हानी, तोटा करणारे ४८. नेत्रकटाक्ष ५०. कट्टर ५४. भांडण, खोडी ५८. केसांची लट ६०. माराची उमटलेली खूण ६३. नाविक दल ६४. कैफी, नशा आणणारे ६५. फटाक्याची माळ ६६. उगीच ६७. जाणे, प्रस्थान करणे ६९. जळलेला, करपलेला भाग ७०. युद्ध ७१. धनी ७३. पान

### शब्दकोडे क्र. 25 चे उत्तर

आडवे उत्तर

१.बुगडी माझी सांडली ग जाता साताऱ्याला १०.गार ११.जस्त १२.मस १४.संगम १६.सडा १७.पाव १८.दादा १९.सनई २१.वाटचाल २२.शरद २३.समजदार २६.गवत २८.नर ३०.दंग ३१.मजा ३३.वट ३६.मकर ३८.सावड ४०.जनगणमन ४३.महिना ४५.भेदक ४७.खातमा ४८.उदर ४९.सर ५०.मुलगा-मुलगी ५२.लगदा ५३.वाटप ५५.दरड ५७.जावक ५८.रजनीकर ६१.बाग ६३.पारधी ६५.डमरु ६६.रणरण ६७.कवी ६८.तजवीज ७०.मज ७१.तर ७२.रीत ७३.कौरव ७४.तवंग ७६.वाकडा ७७.सखा ८०.तरुणाई ८१.भाग्य ८२.रुप ८३.सवलत ८४.टवटवीत

उभे उत्तर

२.गवगवा ३.माग ४.सांगाडा ५.डर ६.गजवदन ७.जास्त ८.साम दाम दंड भेद ९.तास १३.ताई १५.मटकी १६.सलग १७.पार १८.दास १९.सदा २०.नरम २२.शतक २४.जग २५.सावज २७.वमन २९.रसना ३२.जादूगार ३४.टन ३५.पण ३७.रमत ३९.भोक ४१.गजगामिनी ४२.उदाहरण ४९.सपक ५०.मुजोर ५१.गीर ५४.टवटवी ५६.डबा ५९.जरतर ६०.कडवी ६२.गरजवंत ६३.पारखी ६४.परत ६७.करडा ६९.जवस ७०.मत ७१.तक ७२.रीतभात ७३.कौलारू ७५.गरुड ७६.वाईट ७८.खास ७९.पाल

# मेहकरमध्ये लोकशाहीचा मोठा जल्लोष

## ७४.४१ टक्के विक्रमी मतदान : उमेदवारांचे भाग्य मतदान यंत्रात बंद







दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक मध्ये मतदारांनी अभूतपूर्व उत्साहाने सहभाग नोंदवत लोकशाहीची ताकद दाखवून दिली आहे. मतदानाच्या दिवशी सकाळी ७.३० वाजता सुरू झालेली नागरीकांची रांग सायंकाळी ५.३० पर्यंत अखंड सुरू राहिली आणि अखेरीस ७४.४१ टक्के मतदानाची दमदार नोंद झाली. ही टक्केवारी मेहकर नगरपरिषदेच्या निवडणूक इतिहासातील एक महत्त्वाची आणि विक्रमी वाढ मानली जात आहे.

मतदारांचा उत्साह पाहता शहरातील सर्व मतदान केंद्रांवर कडक पोलीस बंदोबस्त, निवडणूक यंत्रणेची प्रभावी कार्यक्षमता आणि स्थानिक प्रशासनाचे नियोजन यामुळे संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार पडली.

**निवडणूक निर्णय अधिकारी रवींद्र जोगी म्हणाले की, ही निवडणूक पूर्णपणे शांततेत व पारदर्शकपणे पार पडली. मतदारांनी जबाबदारीची जाणीव ठेवून मोठ्या प्रमाणात मतदान केले, ही लोकशाहीसाठी अभिमानाची बाब आहे. संपूर्ण आकडेवारी राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आली आहे.**

मेहकर नगर परिषदेसाठी ४४ मतदान केंद्रांवर कोणतीही मोठी तक्रार नोंदली नाही. वृद्ध व दिव्यांग मतदारांसाठी व्हीलचेअर, रॅम्प, वैद्यकीय सहाय्य इत्यादी सुविधांची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

### मतदार व मतदानाची अधिकृत आकडेवारी

**घटक संख्या**

एकूण मतदार – ३७,९३८
पुरुष मतदार – १९,२८८
स्त्री मतदार – १८,६४९
इतर मतदार – १

**झालेले मतदान संख्या**

पुरुष मतदान – १४,६८७
स्त्री मतदान – १३,५४३
एकूण मतदान – २८,२३०
टक्केवारी – ७४.४१%

या निवडणुकीत विशेषतः महिलांचे मतदान १३,५४३ इतके झाले असून, अनेक केंद्रांवर महिला मतदारांची स्वतंत्र रांग रात्रीपर्यंत दिसून आली. तरुण मतदारांमध्येही नेतृत्व बदलण्याची इच्छा तीव्र असल्याची भावना मतदान केंद्रांवर दिसून आली. निवडणूक जागृती मोहिमांचा मोठा प्रभाव यामागे असल्याचे तज्ञांचे मत आहे.राजकीय समीकरणात उलथापालथीचे संकेत असून इतक्या मोठ्या टक्केवारीचे मतदान पाहता शहरातील राजकीय समीकरण बदलण्याची शक्यता राजकीय विश्लेषकांनी मांडली आहे.

### कोणाला जनतेचा कौल?

मेहकर नगरपरिषद निवडणुकीसाठी दोन डिसेंबर रोजी झालेल्या मतदाना शहरातील ३७ हजार ९३८ मतदारांपैकी २८ हजार २३० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. निवडणूक रिंगणातील उमेदवारांच्या भाग्य मतदान यंत्रामध्ये बंद झाले असून मतदारांनी कोणाला कौल दिला आणि मेहकर नगर परिषदेचे कारभारी म्हणून कोणाची निवड केली हे मतमोजणीनंतर २१ डिसेंबर रोजी जाहीर होणार आहे.

विरोधकांनी राबवलेल्या प्रचाराने मतदारांची दिशा बदलली आहे? याचे उत्तर २१ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणीदिवशी मिळणार आहे. आता मेहकरचा नगरपरिषदेसाठी नवा कारभारी निवडणूक निकालानंतर जाहीर होणार आहे.

विवरणपत्र - ७
मतदानाची टक्केवारी
नगर परिषदेचे नाव :- मेहकर नगर परिषद मेहकर जिल्हा :- बुलढाणा
मतदानाचा दिनांक :- ०२.१२.२०२५

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | मतदानकेंद्र क्रमांक | एकूण मतदार पुरुष | एकूण मतदार स्त्री | एकूण मतदार इतर | एकूण मतदार एकूण | सकाळी ७.३० ते ५.३० पुरुष | सकाळी ७.३० ते ५.३० स्त्री | सकाळी ७.३० ते ५.३० इतर | सकाळी ७.३० ते ५.३० एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 1/1 | 464 | 341 | 0 | 805 | 308 | 242 | 0 | 550 | 68.32 |
| 2 | | 1/2 | 417 | 380 | 0 | 797 | 296 | 272 | 0 | 568 | 71.27 |
| 3 | | 1/3 | 386 | 403 | 0 | 789 | 285 | 288 | 0 | 573 | 72.62 |
| 4 | 2 | 2/1 | 447 | 414 | 0 | 861 | 331 | 282 | 0 | 613 | 71.20 |
| 5 | | 2/2 | 470 | 423 | 0 | 893 | 319 | 280 | 0 | 599 | 67.08 |
| 6 | | 2/3 | 437 | 417 | 0 | 854 | 303 | 281 | 0 | 584 | 68.38 |
| 7 | 3 | 3/1 | 446 | 475 | 0 | 921 | 323 | 348 | 0 | 671 | 72.86 |
| 8 | | 3/2 | 506 | 476 | 0 | 982 | 359 | 318 | 0 | 677 | 68.94 |
| 9 | | 3/3 | 439 | 442 | 1 | 882 | 306 | 323 | 0 | 629 | 71.32 |
| 10 | | 3/4 | 385 | 379 | 0 | 764 | 300 | 260 | 0 | 560 | 73.30 |
| 11 | 4 | 4/1 | 480 | 431 | 0 | 911 | 382 | 319 | 0 | 701 | 76.95 |
| 12 | | 4/2 | 488 | 424 | 0 | 912 | 386 | 297 | 0 | 683 | 74.89 |
| 13 | | 4/3 | 516 | 505 | 0 | 1021 | 383 | 374 | 0 | 757 | 74.14 |
| 14 | 5 | 5/1 | 457 | 457 | 0 | 914 | 352 | 327 | 0 | 679 | 74.29 |
| 15 | | 5/2 | 421 | 485 | 0 | 906 | 340 | 366 | 0 | 706 | 77.92 |
| 16 | | 5/3 | 438 | 460 | 0 | 898 | 343 | 343 | 0 | 686 | 76.39 |
| 17 | | 5/4 | 501 | 511 | 0 | 1012 | 410 | 371 | 0 | 781 | 77.17 |
| 18 | 6 | 6/1 | 505 | 454 | 0 | 959 | 402 | 362 | 0 | 764 | 79.67 |
| 19 | | 6/2 | 486 | 456 | 0 | 942 | 393 | 357 | 0 | 750 | 79.62 |
| 20 | | 6/3 | 477 | 457 | 0 | 934 | 372 | 330 | 0 | 702 | 75.16 |
| 21 | 7 | 7/1 | 475 | 441 | 0 | 916 | 379 | 326 | 0 | 705 | 76.97 |
| 22 | | 7/2 | 451 | 473 | 0 | 924 | 389 | 358 | 0 | 747 | 80.84 |
| 23 | | 7/3 | 457 | 469 | 0 | 926 | 387 | 329 | 0 | 716 | 77.32 |
| 24 | | 7/4 | 446 | 447 | 0 | 893 | 392 | 355 | 0 | 747 | 83.65 |
| 25 | 8 | 8/1 | 412 | 436 | 0 | 848 | 312 | 280 | 0 | 592 | 69.81 |
| 26 | | 8/2 | 456 | 396 | 0 | 852 | 383 | 320 | 0 | 703 | 82.51 |
| 27 | | 8/3 | 432 | 396 | 0 | 828 | 333 | 328 | 0 | 661 | 79.83 |
| 28 | | 8/4 | 388 | 350 | 0 | 738 | 274 | 245 | 0 | 519 | 70.33 |
| 29 | 9 | 9/1 | 398 | 408 | 0 | 806 | 322 | 316 | 0 | 638 | 79.16 |
| 30 | | 9/2 | 403 | 396 | 0 | 799 | 309 | 310 | 0 | 619 | 77.47 |
| 31 | | 9/3 | 422 | 396 | 0 | 818 | 336 | 313 | 0 | 649 | 79.34 |
| 32 | 10 | 10/1 | 452 | 470 | 0 | 922 | 326 | 360 | 0 | 686 | 74.40 |
| 33 | | 10/2 | 492 | 481 | 0 | 973 | 353 | 365 | 0 | 718 | 73.79 |
| 34 | | 10/3 | 483 | 506 | 0 | 989 | 349 | 329 | 0 | 678 | 68.55 |
| 35 | 11 | 11/1 | 417 | 427 | 0 | 844 | 345 | 373 | 0 | 718 | 85.07 |
| 36 | | 11/2 | 448 | 444 | 0 | 892 | 303 | 276 | 0 | 579 | 64.91 |
| 37 | | 11/3 | 388 | 361 | 0 | 749 | 271 | 256 | 0 | 527 | 70.36 |
| 38 | | 11/4 | 339 | 320 | 0 | 659 | 271 | 195 | 0 | 466 | 70.71 |
| 39 | 12 | 12/1 | 410 | 389 | 0 | 799 | 306 | 274 | 0 | 580 | 72.59 |
| 40 | | 12/2 | 427 | 380 | 0 | 807 | 316 | 247 | 0 | 563 | 69.76 |
| 41 | | 12/3 | 385 | 348 | 0 | 733 | 273 | 233 | 0 | 506 | 69.03 |
| 42 | 13 | 13/1 | 404 | 382 | 0 | 786 | 297 | 279 | 0 | 576 | 73.28 |
| 43 | | 13/2 | 364 | 344 | 0 | 708 | 288 | 245 | 0 | 533 | 75.28 |
| 44 | | 13/3 | 373 | 399 | 0 | 772 | 280 | 291 | 0 | 571 | 73.96 |
| एकूण | | | 19288 | 18649 | 1 | 37938 | 14687 | 13543 | 0 | 28230 | 74.41 |

निवडणूक निर्णय अधिकारी
नगर परिषद, मेहकर
सार्वत्रिक निवडणूक-२०२५

## वृत्तविशेष...

### गडहिंग्लज पालिकेतील मतदानाबाबत खुलासा

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** गडहिंग्लज नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता प्रत्यक्ष निवडणूक मतदान प्रक्रिया २ डिसेंबर रोजी एकूण ३५ केंद्रावर सुरु आहे. त्या दरम्यान एका वृत्तवाहिनीवर गडहिंग्लज पालिकेमध्ये बोगस मतदान अशा मथळ्याखाली बातमी प्रसिध्द झालेली आहे. त्याबाबतचा खुलासा खालील प्रमाणे करीत आहे.

प्रभाग क्रमांक ४ केंद्र क्र. २ (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज) येथे एक मतदार मतदान करण्यासाठी आला असता त्याच्याकडे आधारकार्डची छायांकित प्रत होती. मतदान अधिकारी क्र. १ यांनी मुळ पुरावा मागितला असता त्याच्याकडे नव्हता. यावर मतदान प्रतिनिधी यांनी हरकत घेतली. तसेच मतदान केंद्राध्यक्ष यांनी त्यांच्याकडील आधार कार्डची छांयांकित प्रत तपासली असता व कसून चौकशी केली असता तो तोतया मतदार असल्याचे चौकशी दरम्यान लक्षात आल्याने त्या व्यक्तीस मतदान न करु देता त्याला पोलिसांच्या स्वाधिन केले आहे. नियमानुसार त्याच्यावर पुढील कार्यवाही करण्यात येत असून कोणतेही बोगस म तदान झालेले नाही. त्यामुळे गडहिंग्लज नगरपालिकेमध्ये बोगस मतदान अशी प्रसिध्द झालेली बातमी ही चुकीची असून त्याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी, गडहिंग्लज नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ यांच्याकडून खुलासा करण्यात आला आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी गडहिंग्लज नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ तथा गडहिंग्लजचे तहसिलदार ऋषिकेश शेळके यांनी दिली आहे.

### वर्सोवा मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रात सहा महिन्यांच्या प्रशिक्षण सत्राचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मत्स्यव्यवसायाचा विकास आणि विस्तार साधण्यासाठी वर्सोवा येथील मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्रात सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन तसेच सागरी डिझेल इंजिन देखभाल व परिचालन या सहा महिन्यांच्या १३५ व्या सत्राचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण १ जानेवारी २०२६ ते ३० जून २०२६ या कालावधीत होत असून पात्र मच्छिमारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

या प्रशिक्षणात मत्स्यव्यवसाय नौकानयनाचे मूलतत्त्व, सागरी डिझेल इंजिनचे भाग, त्यांची दुरुस्ती, मासेमारीची आधुनिक साधने तसेच प्रात्यक्षिक सत्रांचा समावेश आहे. दारिद्रेषेवरील प्रशिक्षणार्थींना प्रतिमहिना ४५० रुपये तर दारिद्रेषेवरील प्रशिक्षणार्थींना प्रतिमहिना १०० रुपये शुल्क आकारले जाणार आहे.या प्रशिक्षणाच्या प्रवेशासाठी प्रशिक्षणार्थी क्रियाशील मच्छिमार व प्रकृतीने सुदृढ असणे आवश्यक असून त्याचे वय १८ ते ३५ वर्षे असावे. प्रशिक्षणार्थीना पोहता येणे बंधनकारक असून तो किमान इयत्ता चौथी उत्तीर्ण असावा. त्याला मासेमारीचा किमान दोन वर्षाचा अनुभव आणि बायोमेट्रिकआधार कार्ड धारक असावा. त्याचप्रमाणे त्याच्याकडे मच्छिमार संस्थेची शिफारस असलेला परिपूर्ण अर्ज आणि दारिद्रेषेवरील असल्यास संबंधित प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.

या प्रशिक्षण सत्राकरिता इच्छुक व पात्र मच्छिमारांनी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित मच्छिमार सहकारी संस्थेच्या शिफारशीसह मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र, पांडुरंग रामले मार्ग, तेरे गल्ली, वर्सोवा, मुंबई–१९ येथे २२ डिसेंबर २०२५ पर्यत सादर करावेत, असे मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी स. श. भालेराव यांनी कळविले आहे. अधिक माहितीसाठी सचिन भालेराव, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी (९९२०२०१२०७) आणि जयहिंद सूर्यवंशी, प्रशिक्षण निर्देशक (७५०७९८८५५२) यांच्याशी संपर्क साधावा.

## 'शूटिंग स्टार्स २०२५' सेलिब्रिटी फुटबॉल सामन्याचे ५ डिसेंबर रोजी आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** 'शूटिंग स्टार्स २०२५' हा सेलिब्रिटी फुटबॉल सामना मुंबई येथे ५ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये टायगर श्रॉफ, सिद्धांत चतुर्वेदी यांसारखे अनेक लोकप्रिय कलाकार सहभागी होणार आहेत. हा उपक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरु करण्यात आलेल्या प्रोजेक्ट महा–देवच्या अंतर्गत आयोजित केला जात आहे.

प्रोजेक्ट महा– देव हा महाराष्ट्रातील U-13 वयोगटासाठीचा पहिलाच असा राज्यस्तरीय उपक्रम आहे, ज्याचा उद्देश भारतीय संघासाठी भविष्याचे उत्तम फुटबॉलपटू तयार करणे हा आहे. २०३४ च्या FIF- विश्र्वचषकासाठी भारताच्या संघात किमान पाच खेळाडू महाराष्ट्रातून असावेत, हे या उपक्रमाचे ध्येय आहे.

या उपक्रमाचे तीन मुख्य आधारस्तंभ आहेत. टॅलेंट आयडेंटिफिकेशन (प्रतिभा शोध): ग्रामीण आणि शहरी भागातील लहान खेळाडूंना शोधून त्यांना संधी देणे. जागतिक दर्जाचे प्रशिक्षणः वैज्ञानिक कोचिंग, फिटनेस, मानसिक आधार, तांत्रिक प्रशिक्षण अशा सर्व सुविधा देणे. दीर्घकालीन खेळाडू विकासः शिक्षण, पोषण, मार्गदर्शन, आणि निवासी प्रशिक्षणाच्या मदतीने मुलांचा सर्वांगीण विकास करणे.

हा उपक्रम क्रीडा व युवक कल्याण मंत्री ड. मणिकराव कोकाटे यांच्या नेतृत्वाखाली, तसेच महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन, वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन आणि व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त सहकार्याने राबवला जात आहे.

या बहुपदरी निवड प्रक्रियेत गावपातळीवरून १०,००० हून अधिक U-13 मुले आणि मुलींनी सहभाग घेतला होता. त्यातून १२० खेळाडूंनी राज्यस्तरीय अंतिम फेरीत प्रवेश मिळवला आहे. आता यातील ६० मुलांची पाच वर्षांच्या निवासी शिष्यवृतीसाठी निवड होणार आहे. या शिष्यवृत्तीत उच्च दर्जाचे प्रशिक्षण, शिक्षण, पोषण आणि १४ डिसेंबर रोजी लिओनेल मेसी यांच्या खास फुटबॉल क्लिनिकमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

'शूटिंग स्टार्स २०२५' हा सामना या सर्व तरुण खेळाडूंना मोठी प्रेरणा देणार असून, महाराष्ट्राच्या तळागाळातील फुटबॉल व्यवस्थेच्या भक्कम बांधणीसाठी राज्याची बांधिलकी अधोरेखित करणारा आहे.

## चॅनेलवरील चर्चेत बदनामी केल्याबद्दल किशोर तिवारी यांना पाच कोटींची भरपाईची नोटीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** एका इंग्रजी वृत्तवाहिनीवरील चर्चेत असत्य व बदनामीकारक वक्तव्ये करून भारतीय जनता पार्टी व आपली बदनामी केल्याबद्दल भाजपाचे प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी सामाजिक कार्यकर्ते किशोर तिवारी यांना बदनामीची नोटीस बजावली असून सात दिवसात या वक्तव्यांबद्दल त्याच वाहिनीवरून बिनशर्त माफी मागावी अन्यथा पाच कोटी रुपयांची भरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे.

मा. विश्वास पाठक हे भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्रचे प्रदेश सहमुख्य प्रवक्ते आहेत. त्यासोबत ते महावितरणसह अन्य सार्वजनिक वीज कंपन्यांचे स्वतंत्र संचालक आहेत. संबंधित इंग्रजी दूरचित्रवाणी वृत्त वाहिनीवरील चर्चेत त्यांनी दि. १ डिसेंबर रोजी भाग घेतला. त्यावेळी किशोर तिवारी हे सुद्धा पॅनेलिस्ट म्हणून सहभागी झाले होते. यावेळी चर्चेत तिवारी यांनी मा. विश्वास पाठक यांच्यावर बदनामीकारक आणि असत्य आरोपांच्या फैरी झाडल्या

किशोर तिवारी यांनी दावा केला की, विश्वास पाठक हे भाजपाचे प्रवक्ते नाहीत. तसेच किशोर तिवारी यांनी पाठक यांच्यावर कोल माफियाचे प्रवक्ते असल्याचा व भ्रष्टाचारात गुंतल्याचा आरोप केला. भारतीय जनता पार्टीच्या महायुतीला महालूटयुती असे संबोधून तिवारी यांनी पाठक यांच्यावर त्याचे घटक असल्याचाही आरोप केला तसेच भाजपाची बदनामी केली.

मा. विश्वास पाठक यांच्या वतीने त्यांच्या वकिलांनी आज दि. २ डिसेंबर रोजी किशोर तिवारी यांना बदनामीकारक वक्तव्यांबद्दल नोटीस बजावली आहे. किशोर तिवारी यांनी असत्य व बदनामीकारक वक्तव्यांबद्दल सात दिवसात बिनशर्त माफी मागावी, माफी मागितली नाही तर त्यांनी अब्रुनुकसानीबद्दल पाच कोटी रुपयांची भरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच नुकसानभरपाई वसूल करण्यासाठी तिवारी यांच्याविरोधात दिवाणी आणि फौजदारी खटला चालविण्याचा इशाराही नोटिशीत देण्यात आला आहे.

## नगरपालिका निवडणुकीत सत्ताधारी पक्षाचा रडीचा डाव

### बुलढाण्यात सत्ताधारी पक्षाकडून बोगस मतदान, कठोर कारवाई करा: सपकाळ



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नगरपालिका निवडणुकीच्या मतदानात सत्ताधारी भाजपा महायुती रडीचा डाव खेळत आहे. निवडणुका निष्पक्ष व पारदर्शकपणे पार पाडणे हे निवडणूक आयोगाचे कर्तव्यच आहे पण बुलढाण्यासह राज्याच्या विविध भागात तरी तसे होताना दिसत नाही. ग्रामीण भागातून गाड्यांमध्ये भरून लोकांना बुलढाण्यात आणून बोगस मतदान केले पण पोलीस व प्रशासनाने बघ्याची भूमिका घेतली. बोगस मतदान करणारे व त्यांना तसे करावयास लावणाऱ्यांवर कठोर कारवाई करा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

नगरपालिकेच्या मतदानावेळी राज्यात अनेक ठिकाणी गैरप्रकार पाहण्यास मिळाले. यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, बुलढाण्यात ग्रामीण भागातून गाड्या भरून बोगस मतदार आणण्यात आले. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी बोगस मतदार पकडल्यानंतर स्थानिक आमदाराच्या लोकांनी पोलिसांशी हुज्जत घातली आणि पोलिसही किरकोळ कारवाई करतो असे सांगतात, ही लोकशाहीची थट्टा आहे. सत्ताधारी किती भ्रष्ट आहेत व गुंडगिरी करतात हे त्यांनी आज पुन्हा दाखवून दिले. काँग्रेसला वातावरण पोषक आहे पण सत्ताधारी भाजपा महायुती रडीचा डाव खेळत आहे. सत्ताधाऱ्यांनी काहीही केले तरी काँग्रेसचा विजय होणार असे हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.

बुलढाणा नगरपालिका निवडणुकीसाठी सकाळी ७ वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली आणि केवळ दीड तास उलटत नाही तोच बोगस मतदान करण्यासाठी सुरूवात झाली. प्रभाग क्रमांक १५ साठी गांधी प्राथमिक शाळा येथे मतदान केंद्र आहे. येथे असलेल्या वैभव देशमुख नामक व्यक्तीच्या नावावर कोथळी तालुका मोताळा येथील एकाला बोगस मतदान केल्यानंतर पकडले. त्याच्यासोबत आणखी एकजण होता. कोथळी, इब्राहिम पूर येथून अनेक लोक बोगस मतदान करण्यासाठी आणण्यात आले. घाटाखालून गाड्या भरून बुलढाण्यामध्ये बोगस मतदार आणले होते, अशी माहिती हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली.

## बुलढाण्यात बोगस मतदार प्रकरणी तीन वेगवेगळ्या घटनेत सहा जणांवर गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा नगरपरिषद निवडणुकीमध्ये बनावट मतदान करण्यासाठी आलेल्या तोतया मतदाराला पळून जाण्यास मदत करणे व शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी शिवसेना आमदार संजय गायकवाड यांचे पुत्र कुणाल गायकवाड, पुतण्या श्रीकांत गायकवाड व अनोळखी एक अशा एकूण तीन जणांवर बुलढाणा शहर पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.






बुलढाणा शहरातील शासकीय तांत्रिक विद्यालयातील मतदान केंद्रावर एक व्यक्ती बनावट मतदान करण्यासाठी आला असता काही प्रतिनिधींच्या ते लक्षात आल्याने चांगलाच गोंधळ उडाला, हा व्यक्ती पळ काढत असतानाच काही नागरिकांनी त्याला पकडले आणि चांगलाच चोप दिला. दरम्यान कुणाल गायकवाड व श्रीकांत गायकवाड यांनी पोलीस कर्मचाऱ्याला लोटपाट करत पोलिसांच्या तावडीत असलेल्या व्यक्तीला पळून जाण्यास मदत केली, त्यावरून पळून जाणारा अनोळखी व्यक्ती, कुणाल गायकवाड आणि श्रीकांत गायकवाड यांच्यावर शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. तर दुसऱ्या घटनेमध्ये बुलढाणा शहरातीलच गांधी प्राथमिक शाळेतील मतदान केंद्रावर तीन तोतया मतदारांनी बनावट मतदान केल्याप्रकरणी केंद्रप्रमुखांनी दिलेल्या तक्रारीवरून तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये दोन तरुण व एका महिलेचा समावेश आहे. त्यापैकी एक महिला व तरुणाला बुलढाणा शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.